ePaper
ज्येष्ठ अभिनेते रवींद्र महाजनी यांचं पुण्यातील घरी निधन



| वर्ष - 7 । अंक -74 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- चांद्रयान -३ निघाले मोहिमेवर
- महायुतीचे खातेवाटप जाहीर
- कोहलीचा विराट रेकॉर्ड
- जान्हवी भावूक झाली

www .mahaenews.com । शनिवार, दिनांक 15 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# विचारधारेशी तडजोड नाही!

## »शहरातील 'युवकांची' भूमिका : इम्रान शेख यांची वाटचाल 'साहेबांसोबत'च?

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा 'बालेकिल्ला' अशी ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतील युवकांनी पक्षात झालेल्या ऐतिहासिक बंडानंतर 'विचारधारेशी' तडजोड न करण्याचा निर्णय घेतल्याचे पहायला मिळते. विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे यांनी 'मी साहेबांसोबतच' असा नारा दिल्यानंतर आता युवक सेलचे शहराध्यक्ष इम्रान शेख यांनीही तीच भूमिका घेतल्याचे चित्र आहे.**








राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी शिंदे-फडणवीस सरकारसोबत सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पक्षात दोन गट निर्माण झाले. पक्षातील प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, सुनील तटकरे, रुपाली चाकणकर यांच्यासारखे ज्येष्ठ नेते 'अजित पवार गटात' सहभागी झाले. दुसरीकडे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, डॉ. अमोल कोल्हे, युवक सेलचे प्रदेशाध्यक्ष मेहबुब शेख, विद्यार्थी आघाडीचे सुनील गव्हाणे, युवती आघाडीच्या सक्षणा सलगर अशी दुसरी फळी 'शरद पवार गटात' कायम राहिली आहे. पिंपरी-चिंचवड शहराचा विचार करता शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी महापौर संजोग वाघेरे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, मोरेश्वर भोंडवे, राजू मिसाळ अशी मंडळी अजित पवार यांच्यासोबत आहेत. तर विद्यार्थी सेलचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, युवक सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष रविकांत वरपे यांनी शरद पवार यांच्या गटासोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर आता युवक सेलचे शहराध्यक्ष इम्रान शेख हेसुद्धा 'विचारांशी तडजोड' करणार नाहीत, असे स्पष्ट संकेत आहेत.

दरम्यान, मूळ राष्ट्रवादीचे युवक सेलचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांनी राज्यातील शहराध्यक्ष, जिल्हाध्यक्षांच्या नियुक्ती जाहीर केल्या आहेत. त्यामध्ये इम्रान शेख यांचे नाव कायम आहे. याउलट, महिला प्रदेशाध्यक्षा विद्या चव्हाण यांनी महिला आघाडीच्या शहराध्यक्षा डॉ. कविता आल्हाट यांची नियुक्ती रद्द केली होती. पण, अजित पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी तात्काळ आल्हाट यांना शहराध्यक्षपदी नियुक्ती दिली आहे. त्यामुळे शरद पवार आणि अजित पवार अशा दोन्ही गटांच्या राष्ट्रवादीची धुरा कोणा-कोणाच्या खांद्यावर जाणार? शरद पवार गटाचे शहराध्यक्ष कोण होणार? अशी चर्चा शहराच्या राजकारणात रंगली आहे.

### अजित पवार गटाला उणीव भासणार...

पिंपरी-चिंचवड शहरात १५ वर्षे निर्विवाद सत्ता गाजवलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला विरोधी बाकावर बसल्यानंतर सत्ताधाऱ्यांविरोधात आंदोलने यशस्वी करता आली नाही, असा आक्षेप घेतला जात होता. मात्र, इम्रान शेख यांनी युवक सेलच्या माध्यमातून आंदोलने यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. किंबहुना, राष्ट्रवादी "इम्रान भरोसे" अशी स्थिती निर्माण झाली होती. शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या खांद्याला खांदा लावून इम्रान शेख यांनी युवकांची फळी उभी केली आणि आंदोलनांमध्ये पक्ष संघटनेचा दबदबा कायम ठेवला. चिंचवड विधानसभेतील पोटनिवडणुतील युवक सेलचे ४५० कार्यकर्ते मेहनत घेत होते, असे सांगितले जाते. त्यामुळे आगामी काळात शहरातील अजित पवार गटाला युवकांची एकजूट असलेला इम्रान शेख सारखा तगडा अल्पसंख्याक चेहरा शोधावा लागणार आहे.

### "संघर्ष जारी रहेगा... " पोस्ट बोलकी...

**»दि. १२ जुलै २०२३ रोजी इम्रान शेख यांनी आपल्या फेसबुक अकाउंटवर पोस्ट केली आहे. त्यामध्ये माझ्यासोबत कामगार, कष्टकरी वर्गातील दीन-दलित समाजातील, अल्पसंख्याक समाजाचे युवक काम करीत आहेत. त्यांना माझ्याकडून अपेक्षा आहेत. त्यामुळे "संघर्ष जारी रहेगा..." शिव फुले शाहू आंबेडकर विचारसरणीवर चालणाऱ्या बहुजन तरुणांना माझ्याकडून अपेक्षा आहेत. मी नेहमीच माझ स्वतःचं कल्याण करण्याआधी या माझ्या बहुजन तरुणांचं कल्याण कसं करता येईल याचाच विचार केला आहेआणि यापुढेही करत राहील ही ग्वाही देतो. "इस जोर जुलूम की टक्कर में संघर्ष हमारा नारा है।" अशा आशयाची बोलकी पोस्ट इम्रान शेख यांनी सोशल मीडियावर व्हायरल केली आहे. त्यामुळे त्यांनी जाती-जाती आणि धर्मा-धर्मांत विविद निर्माण होतील, अशा विचारांसोबत कदापि साथ-सोबत नाही, असा अप्रत्यक्ष पवित्रा घेतला आहे. कारण, अल्पसंख्याक किंवा मुस्लिम समाजातील युवकांना शरद पवार हे आश्वासक नेते वाटतात... असे सांगितले जाते.**

# अनुदानित शाळांना सरकारी दर्जा!

## » शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांची माहिती

### » राज्यातील सर्व शाळांमध्ये वेब कॅमेरे बसविण्यात येणार

। पुणे/ जेजुरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या तुलनेत अनुदानित शाळांचा दर्जा घसरला आहे. या शाळांच्या १०० टक्के खर्च सरकार करीत असल्याने, त्यांना सरकारी दर्जा देण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी शुक्रवारी येथे दिली. राज्यातील सर्व शाळांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करून, वेब कॅमेरे बसविण्यात येणार आहे. त्याद्वारे वर्गातील हालचालींवर लक्ष ठेवण्यात येईल, असेही केसरकर यांनी स्पष्ट केले.**



शालेय शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमानिमित्त केसरकर पुण्यात आले होते. खासगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळांचा पूर्ण खर्च हा सरकार करते. मात्र, या शाळा खासगी असल्याने, त्यांना केंद्र सरकारची कोणतीही मदत मिळत नाही. या शाळांना सरकारी दर्जा मिळाल्यास, केंद्र सरकारच्या योजनेचे अनेक लाभ या शाळांना मिळू शकणार आहे. केंद्राच्या विविध योजना राबविता येणार आहे. देशात महाराष्ट्र, गुजरात आणि उत्तर प्रदेश वगळता इतर सर्वत्र राज्यात याच पद्धतीने शाळा सुरू आहेत. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला आहे. याला मान्यता मिळाल्यास मोठ्या प्रमाणात मदत शाळांना मिळणार आहे, असे केसरकर यांनी स्पष्ट केले. केसरकर म्हणाले की, राज्य सरकारने शालेय शिक्षणाचा वाढविण्यासाठी अनेक चांगले निर्णय गेल्या सहा महिन्यात घेतले आहेत. त्यानुसार शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात आले. शिक्षणसेवकांच्या मानधनात वाढ करण्यात आली, तर पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्तीच्या रक्कमेतही वाढ झाली आहे. शाळांमध्ये दररोज किती विद्यार्थी येतात, यावर कोणतेही नियंत्रण नाही. त्यामुळे यापुढे कॅमेरांच्या माध्यमातून ही तपासणी करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी एआय तंत्रज्ञानासारख्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल. त्यासाठी मुलांच्या हाती विविध पर्याय असणारे रीमोट देण्यात येईल. प्रश्न विचारल्यावर, विद्यार्थ्यांकडे असलेल्या रीमोटद्वारे उत्तर द्यावे लागेल. त्यानुसार विद्यार्थ्यांचे मूल्यमापन होईल. याद्वारे आपल्याला प्रत्येक विद्यार्थ्याची आणि ट्रेन्डची माहिती मिळणार आहे, असेही केसरकर यांनी सांगितले.

### शैक्षणिक गुणवत्तेत महाराष्ट्र सातव्या स्थानी

» राज्याची शैक्षणिक गुणवत्ता ठरविण्यासाठी नवे निकष आले आहेत. त्यानुसार पहिल्या पाचमध्ये एकही राज्य नाही. त्यानंतर पंजाब आणि चंडिगढ ही दोन राज्ये आहेत. या राज्यांनतर महाराष्ट्राचा क्रमांक असल्याने, शैक्षणिक गुणवत्तेत महाराष्ट्र सातव्या स्थानी गेलेले नाही. पुढील वर्षी जाहीर होणाऱ्या शैक्षणिक गुणवत्तेच्या अहवालात महाराष्ट्र पुढे राहणार आहे, असे स्पष्टीकरण केसरकर यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पत्रावर दिले आहे.

# साहित्य माणसाला प्रगल्भ करते

## » न्यायमूर्ती चपळगावकर यांचे प्रतिपादन

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सत्वशील माणसांप्रमाणेच कसदार साहित्याने मला घडविले. त्या काळी वाचलेल्या साहित्याने सर्व प्रकारची जाणीव दिली. साहित्य माणसाला प्रगल्भ करते, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे विद्यमान अध्यक्ष न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केले**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने न्यायमूर्ती चपळगावकर यांचा परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

योगायोग म्हणजे चपळगावकर यांचा आज वाढदिवस असल्याने या सोहळ्यात दुग्धशर्करा योग जुळून आला. याप्रसंगी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष रवींद्र शोभणे, नंदिनी चपळगावकर, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कोशाध्यक्ष सुनीताराजे पवार, उपाध्यक्ष राजीव बर्वे उपस्थित होते.

न्या. चपळगावकर म्हणाले, "समाज अनेकदा आपल्याला आधार देतो, उभे करतो. त्याचप्रमाणे साहित्य प्रगल्भ जाणीवा देते. समाजात काय टिपायचे हे समजण्यासाठी लेखकाची नजर लागते. गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर यांनी एक वेगळेच जग उलगडले, बा. भ. बोरकर, मंगेश पाडगांवकर यांचे बोट धरून आम्ही प्रेम करायला शिकलो. त्यातून मन समृद्ध होत गेले. साहित्य माणसाला मोठं करते आणि बोटाला धरून पुढे नेते ही जाणीव मनात आहे.



### वैचारिक लेखनाला वेगळे परिमाण

» प्रास्ताविक महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी केले. ते म्हणाले, ग्रंथकार संमेलनाची सुरुवात करणाऱ्या आणि पहिल्या संमेलनाचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या न्या महादेव गोविंद रानडे यांच्या नंतर न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर हे न्यायमूर्ती असणारे दुसरे संमेलनाध्यक्ष आहेत. ते व्रतस्थ ज्ञानोपासक आहेत. तर्कशुद्ध मांडणी, वैचारिक स्पष्टता, निर्भयता,तटस्थता, अव्यभिचारी जीवननिष्ठा आणि वाङमयनिष्ठा यामुळे त्यांच्या वैचारिक लेखनाला वेगळे परिमाण लाभले.

# पुणे ग्रामीण पोलीस दलात मोठे फेरबदल

। पुणे। महाईन्यूज । ।

पुणे ग्रामीण पोलीस दलात फेरबदल करण्यात आले आहेत. दोन वर्षे सेवा कालावधी पूर्ण झालेल्या पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांना नवीन पोलीस ठाण्यात रुजू होण्याचे आदेश पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी दिले.

बदली झालेले अधिकारी पुढील प्रमाणे- संजय शंकर जगताप ( कामशेत ते शिरूर) , अण्णासाहेब बाळासाहेब घोलप (सासवड ते राजगड) , उमेश तावस्कर ( जेजुरी ते नियंत्रण कक्ष) , महेश कृष्णराव ढवाण( पोलीस कल्याण शाखा ते रांजणगाव), बळवंत कुंडलिक मांडगे , सचिन दिनकर पाटील (राजगड ते नियंत्रण कक्ष) , विलास शामराव भोसले , सतीश भाऊसाहेब होळकर( मंचर ते आर्थिक गुन्हे शाखा) , संतोष शामराव जाधव (सुरक्षा शाखा ते सासवड), बापूसाहेब पोपट सांडभोर (जिल्हा वाहतूक शाखा ते जेजुरी). दरम्यान, पुणे ग्रामीण पोलीस दलामध्ये नव्याने बदलून आलेल्या अधिकाऱ्यांना नवीन नियुक्तीची ठिकाणे पुढीलप्रमाणे: बबन शंकर पठारे (नियंत्रण कक्ष), अण्णा मन्या पवार (आर्थिक गुन्हे शाखा) , ललित भगवान वरटीकर(नियंत्रण कक्ष), रवींद्र दत्तात्रय पाटील (कामशेत) , कुमार रामचंद्र कदम ( वडगाव मावळ) , दिनेश सखाराम तायडे (बारामती शहर) , सुभाष सदाशिव चव्हाण , राजेश गणेश गवळी (पोलीस कल्याण शाखा) , सूर्यकांत देवराव कोकणे ( नियंत्रण कक्ष) , सुहास लक्ष्मण जगताप शंकर मनोहर पाटील (भोर पोलीस ठाणे).

# महापालिकेचा प्रदूषण मुक्त ‘प्रवास’!

## इलेक्ट्रिक वाहने ताफ्यात दाखल : आयुक्त शेखर सिंह यांनी केले उद्घाटन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील प्रदुषण कमी होण्याच्या दृष्टीने महानगरपालिका विविध उपक्रम राबवित असून वाहनप्रदुषण कमी होण्याच्या दृष्टीने महापालिकेने सुमारे ७९ इलेक्ट्रिक वाहने भाडेतत्वावर घेण्याचे नियोजन केले आहे. यापूर्वी २२ इलेक्ट्रिक वाहने कार्यरत आहेत. आज टाटा नेक्सॉन वर्गातील ७ इलेक्ट्रिक वाहने महानगरपालिकेच्या यांत्रिकी विभागात दाखल झाली आहेत. या वाहनांच्या उद्घाटन समारंभाचे आयोजन आयुक्त शेखर सिंह यांच्या उपस्थितीत महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य इमारतीत करण्यात आले होते.**



यावेळी अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उप आयुक्त रविकिरण घोडके, सह शहर अभियंता बाबासाहेब गलबले, प्रमोद ओंभासे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता बापू गायकवाड, कैलास दिवेकर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.

महापालिकेच्या वतीने ५ वर्षांच्या कालावधीसाठी भाडेतत्व करारावर वाहने घेणेत आली असून गरज पडल्यास वाहनांची संख्या वाढविण्याचे अथवा कमी करण्याचे प्रयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये २५ टाटा नेक्सॉन आणि ५४ टाटा टिगोर इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश आहे.

### वीज आणि पैशाची बचत...

महानगरपालिकेच्या धोरणानुसार अधिकारी व पदाधिकारी यांना एकुण ९५ वाहने मंजूर असून सद्यस्थितीतील पेट्रोल, डिझेलवर चालणाऱ्या वाहनांची संख्या कमी करून जास्तीत जास्त इलेक्ट्रिक वाहन वापरावर भर दिला जाणार आहे. टाटा नेक्सॉन या वर्गातील वाहने एका चार्जिंगनंतर ३१२ किलोमीटर अंतर पार पाडतात. त्यासाठी ३० युनिट तर टाटा टिगोर ही वाहने एका चार्जिंगमध्ये १७० किलोमीटर अंतर पार पाडत असून त्यासाठी २६ युनिट इतकी वीज खर्ची पडते. आज दाखल झालेली टाटा नेक्सॉन वाहने ही आधुनिक प्रणालीची असून या सर्व वाहनांमध्ये जीपीएस ट्रॅकर सिस्टीम बसवण्यात आली आहे. तसेच या प्रकारच्या वाहनांचा देखभाल व दुरूस्तीचा खर्च पेट्रोल आणि डिझेल वाहनांपेक्षा अत्यंत कमी असल्याने महापालिकेच्या वाहन खर्चात बचत होणार असल्याची माहिती सह शहर अभियंता बाबासाहेब गलबले यांनी दिली.

# रिंगरोडला बाधित शेतकऱ्यांचा विरोध

## सीमांकनाचे काम थांबवले : ... अन्यथा तीव्र आंदोलन करणार

। मावळ ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या रिंगरोडला इंदोरीतील बाधित शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला असून, रिंगरोड क्षेत्राची मोजणी व सीमांकनाचे काम शेतकऱ्यांनी थांबविले आहे.**

रिंगरोडबाबत १९ मे २०२१ रोजी प्रसिद्ध केलेल्या राजपत्रानुसार रिंगरोडची पाहणी व मोजणी करून जागेवर चिरे लावून सीमांकन केले होते. परंतु त्यानंतर कोणालाही कसलीही पूर्वसूचना न देता एक नोव्हेंबर २०२२ रोजी नवीन राजपत्र प्रसिद्ध करून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू केली आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. यातून वनक्षेत्र विभाग व शासकीय गायरान क्षेत्र वाचवून शेतकऱ्यांना देशोधडीस पाठवण्याचा हेतू दिसत आहे. म्हणून शेतकऱ्यांचा नवीन रिंगरोडला विरोध कायम राहील. बाधित २१ शेतकऱ्यांनी महाराष्ट्र राज्य विकास महामंडळास लेखी निवेदन उपअभियंता गोविंद गायकवाड व तळेगाव विभागाचे मंडलाधिकारी बी. के. मेकाले यांच्याकडे निवेदन सुपूर्त केले. निवेदनाचा सहानुभूतिपूर्वक विचार होऊन पूर्वी सीमांकन केलेला रिंगरोड करण्याचा निर्णय घ्यावा. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनात दिला आहे.

भंडारा डोंगर तीर्थक्षेत्राचे व वारकऱ्यांचे नाव पुढे करून हा धनदांडग्यांनी रचलेला डाव आहे. कारण भंडारा डोंगर देवस्थान क्षेत्र हद्द व या अगोदर निश्चित केलेल्या रिंगरोडची हद्द यात सुमारे दोन किलोमीटरचे अंतर होते. भंडारा डोंगराच्या पायथ्याजवळून व डोंगरास कोणताही अडथळा होत नव्हता.

अथवा वारकरी भाविक भक्तांच्या भावनेस बाधा होण्याचेही काही कारण नव्हते. नाही तरी डोंगरावर मंदिरापर्यंत गेलेला रस्ता डोंगर क्षेत्र फोडूनच नेला आहे. त्यावेळी वारकऱ्यांच्या भावनांचा विचार नाही झाला. आता केवळ गरीब शेतकऱ्यांवर अन्याय करून श्रीमंतांना वाचवायचे आहे. हे या बदलातून स्पष्ट दिसत आहे, अशी प्रतिक्रिया हरिदास ढोरे यांनी व्यक्त केली.



### धनदांडग्यांचे भूक्षेत्र वाचवण्याचा प्रयत्न...

केवळ धनदांडग्यांचे भूक्षेत्र व स्थावर मालमत्ता वाचविण्यासाठी हा नवीन खटाटोप करण्यात आला आहे. वनक्षेत्र वाचवून तळेगाव चाकण रस्ता ओलांडून पलिकडे दक्षिण बाजूस रिंगरोड नेऊन पुन्हा पुढे काही अंतरावर तळेगाव चाकण रस्ता ओलांडून रिंगरोड पुन्हा उत्तर बाजूस वळविला आहे. यातून स्पष्ट दिसून येते की गरीब शेतकऱ्यांवर अन्याय करून श्रीमंतांच्या जमिनी वाचविल्या आहेत, असे नंदकुमार ढोरे, मनोहर काशीद व सुदाम भसे यांनी सांगितले..

> बाधित शेतकऱ्यांनी विनंती केली आहे की याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आम्ही चर्चा करतो. त्यानुसार काम करा. म्हणून तात्पुरत्या स्वरूपात काम थांबविले आहे.
>
> **– गोविंद गायकवाड,**
> **उपअभियंता, महाराष्ट्र राज्य विकास महामंडळ..**



# महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांनी अनुभवली ‘चांद्रयान-3’ अवकाशात झेप!


। पिंपरी चिंचवड। महाईन्यूज ।

भारताचे ‘चांद्रयान-3’ हे महत्त्वाकांक्षी यान शुक्रवारी दुपारी यशस्वीरित्या चंद्राच्या दिशेने झेपावल्याचा अनुभव पिंपरी चिंचवड मनपा शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या वर्गातूनच घेतला. सोनवणे वस्ती प्राथमिक शाळा, म्हेत्रे वस्ती प्राथमिक शाळा, मोहननगर प्राथमिक शाळा, रहाटणी मुलांची शाळा, पुनावळे मुलांची शाळा याठिकाणी विद्यार्थ्यांना वर्गांमध्ये स्मार्ट टीव्हीच्या माध्यमातून थेट प्रेक्षपणाद्वारे अवकाश तंत्रज्ञान क्षेत्रातील भरारीचा क्षण अनुभवता आला. ‘काउंट डाऊन’ संपताच ज्वाळांचे लोट खाली सारत इस्रोच्या ‘बाहुबली रॉकेट’ म्हणजेच LVM-3 मधून चांद्रयान-3 वेगाने आकाशाच्या दिशेने झेपावले. आसमंत हादरवणाऱ्या रॉकेटच्या आवाजात टाळ्यासह ‘भारत माता की जय’च्या घोषणा देत भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्रो) शास्त्रज्ञांची आणि स्वदेशी तंत्रज्ञानाची कमाल ‘याची देहि याची डोळा’ विद्यार्थ्यांनी अनुभवली. शाळेच्या मुख्याध्यापकांनी पुढाकार घेत दूरदर्शन वरून ‘चंद्रयान– 3’ थेट प्रेक्षपण पाहण्याची व्यवस्था करून देत संपूर्ण जगाचं लक्ष लागलेल्या भारताच्या या चांद्रयान – 3 मोहिमेची माहिती दिली.

भारताची चांद्रयान-तीन ही मोहीम यशस्वी ठरली तर अमेरिका, रशिया आणि चीननंतर चंद्रावर यान उतरवणारा भारत हा जगातील चौथा देश ठरला आहे. चांद्रयान-3 अंतराळयान 23 ऑगस्ट रोजी चंद्राच्या पृष्ठभागावर आहे. 3.84 लाख किलोमीटरचा प्रवास केल्यानंतर चांद्रयान-3 चंद्राच्या पृष्ठभागावर उतरेल.




# पाऊल चंद्रावर, मेंदू मंदिरात!



**भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रो आपल्या चांद्रयान 3 च्या मोहिमेत व्यस्त आहे,शुक्रवारी 14 जुलै 2023 रोजी दुपारी हे यान चंद्रावर पाठवले. त्यापूर्वी इस्रो प्रमुख एस. सोमनाथ आणि त्यांच्या चमूने केलेले पराक्रम जगभर चर्चेत आहेत.या मोहिमेला यश मिळावे म्हणून हे शास्त्रज्ञ तिरुपती बालाजीच्या मंदिरात पूजा करून आले.**

एवढेच नव्हे तर किमान अकरा मंदिरात ही टीम पूजा, अर्चना करून प्रार्थना करणार आहे,आपल्या देशातील संशोधकांच्या अकलेचे दिवाळे कसे निघत असते याचे हे मूर्तिमंत उदाहरण आहे.

मोहीम यशस्वी झाली तर श्रेय देवाला अन फसली तर चुका व्यक्तींच्या पदरात घातल्या जातात. वैज्ञानिक दृष्टिकोन आजही आपल्या देशात संशोधकांच्या मेंदूत अंतर्बाह्य शिरू शकला नाही हे पदोपदी जाणवत असते. या देशात अगोदरच देव,दैवीशक्ती असल्या कल्पनांनी खुपमोठी हानी करून ठेवली आहे.देव मानला की नशीब मानावे लागते आणि मग सगळे काही ठरलेले असते यावर विश्वास बसतो ,त्याचा फायदा घेत भारतीय लोकांना लुटण्याची नवी इंडस्ट्री आपल्या देशात सुरू झाली आहे,तिला पूरक धंदे जर शास्त्रज्ञ करायला लागले असतील तर आगामी हजार वर्षे तरी आपला देश विवेकी होणार नाही हे नक्की आहे. आपल्या देशात कोणत्याही नव्या संशोधनाला सहज मान्यता न देणारा मेंदू विकसित करण्याचे काम सगळ्या धर्म आणि त्यांच्या पौराणिक साहित्याने केले आहे,वेद आणि कुराण यांच्यातून जसे विज्ञान जबरदस्तीने काढून आपल्या पुढ्यात मांडले जाते तसेच ते सगळ्या धार्मिक आयोजनात पण डोक्यात घातले जाते.

विमान आपल्या पुराणात असते तसेच अवयव प्रत्यारोपण पण झाल्याचे पुरावे देण्याचा धर्म अट्टाहास करीत असतो.जे धर्म पृथ्वी सपाट असल्याचे सांगत होते तेच नन्तर गोल असल्याचे अर्थ काढायला लागले आहेत.

कुणाचा अल्लाह सहा दिवसात पृथ्वी,आकाश अन माणसाला निर्माण करतो तर कुणाचा गॉड मातीपासून मानव निर्माण केल्याचे अजब ज्ञान जगाला देतो ,तर कुणाचे वेद विश्व निर्माण करण्याचे जगावेगळे दावे करतात आणि तरीही या धर्माचे उच्चशिक्षित अनुयायी हे सगळे बिनबोभाट मान्य करीत असतात. धर्म आणि श्रद्धा व्यक्तीच्या मेंदूला बधिर करीत असतात पण आपल्या देशात हेच मेंदू ठार निकामी झाल्याचे आढळते.हेच कोट्यवधी अनुयायी उठता बसता देव,अल्लाह,गॉडचे स्मरण करीत असतात आणि त्याचवेळी नास्तिक विज्ञानाने निर्माण केलेल्या सगळ्या आधुनिक सुविधांचा वापर करीत असतात ,यात त्यांना कोणताही अंतर्विरोध वाटत नाही .

धर्माच्या उतरंडीला धक्के देणाऱ्या गोष्टी करणारे घटक सुद्धा आपल्या देशात त्याचे श्रेय मानवी मेंदूला न देता जेव्हा देवाला देतात तेव्हा यांच्या दुटप्पी जगण्याची चीड येते.मिसाईल मॅन अब्दुल कलाम देखील याला अपवाद नव्हते,ते तर सगळी मंदिरे फिरत असत,त्यांनी लबाड सत्यसाई बाबांच्या पायावर सुद्धा डोके ठेवले होते.त्याचाच वारसा आपल्या देशातले सगळे संशोधक चालवतात की काय असा संशय घ्यायला भरपूर जागा आहे.म्हणूनच आपल्या देशात विज्ञानाचे आविष्कार असणारी उपकरणे घरी,कार्यालयात आणली जातात तेव्हा त्यांची कुंकवाची पाच बोटे लावून पूजा केली जाते.

ज्या आरोग्य शास्त्राने देव,धर्म आणि कथित दैवीशक्ती कधीच लाथाडल्या त्या क्षेत्रातही महाकाय उपकरणे जेव्हा डीन ,विभाग प्रमुख यांच्या हस्ते पुजले जातात तेव्हा या आधुनिक शोधांची हेच लोक प्रेतयात्रा काढत असतात. सरकारी कार्यालये किंवा आधुनिक इस्पितळे जेव्हा साग्रसंगीत सत्यनारायण महापूजा घालतात तेव्हा तर प्रसादाच्या रांगेत उभ्या असणाऱ्या सुटा बुटातल्या आदी मानवांची कीव यायला लागते.

## संपादकीय »

# गुंतागुंत टॅक्स!

***कर आकारणीचे सहा-सात टप्पे आणि पेट्रोल-डिझेल, मद्य हे या कर आकारणीच्या बाहेर ही आपली 'सोप्या' वस्तू-सेवा कर रचनेची व्याख्या.***

आहे तो गुंता सोडविण्याच्या मिषाने आयोजित बैठकीत नवा गुंता कसा करावा याचे अध्ययन करू इच्छिणाऱ्यांस 'वस्तू-सेवा कर परिषदे'च्या बैठका हा मोठाच आधार ठरेल. सहा वर्षे झाली. पण या वस्तू-सेवा कराचा गुंता सोडवणे हे अद्यापही आपणास जमलेले नाही. या कराबाबत निर्णय घेणाऱ्या 'वस्तू-सेवा कर परिषदे'ची ५० वी बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत ५१ व्या बैठकीस कार्यक्रमपत्रिका पुरवण्याचे उद्दिष्ट तर साध्य केले गेलेच; पण मुळात सोप्या आणि सुलभ मांडणीचे आश्वासन देत रेटण्यात आलेला हा कर अधिक अवघड आणि दुर्गम करण्याचा आपला परिपाठ कायम ठेवला. कर आकारणीचे सहा-सात टप्पे आणि पेट्रोल-डिझेल, मद्य हे या कर आकारणीच्या बाहेर ही आपली 'सोप्या' वस्तू-सेवा कर रचनेची व्याख्या. या कर प्रणालीच्या पहिल्या काही दिवसांत झालेला गोंधळ एक वेळ समजून घेता येईल.

**वांशिक हिंसाचारावरून मणिपूर धुमसत असतानाच आसाममधील मतदारसंघांची पुनर्रचना हा विषय वादग्रस्त ठरला आहे. परदेशी नागरिकांचा मुद्दा असो वा नागरिकत्व पडताळणी किंवा मतदारसंघांची पुनर्रचना आसाममध्ये कोणताही विषय हा संवेदनशील ठरतो. आसाममधील मतदारसंघांच्या पुनर्रचनेचा मसुदा गेल्याच महिन्यात प्रसिद्ध करण्यात आला त्यावरून नेहमीप्रमाणेच वाद उद्भवला.**

# सत्ताधाऱ्यांना सोयीची पुनर्रचना ?

अरुणाचल प्रदेश आणि नागालॅण्डमधील मतदारसंघांच्या पुनर्रचनेचा विषय कायदेशीर कचाट्यात सापडला आहे. अरुणाचल प्रदेशमधील मतदारसंघाच्या पुनर्रचनेवरून सर्वोच्च न्यायालयात केंद्र आणि निवडणूक आयोगाच्या अधिकारांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला. अरुणाचल प्रदेशमधील मतदारसंघांची पुनर्रचनेची प्रक्रिया पार पाडण्याकरिता निवडणूक आयोगाला केंद्राच्या मंजुरीची आवश्यकता कशाला, असा सवाल सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी दोनच दिवसांपूर्वी उपस्थित केला. मतदारसंघांच्या पुनर्रचनेकरिता स्वतंत्र आयोग नेमला जातो. लोकप्रतिनिधी कायद्यातील तरतुदीनुसार आसाम, मणिपूर, अरुणाचल प्रदेश आणि नागालॅण्ड या चार राज्यांमधील परिस्थिती अनुकूल नसल्यास राष्ट्रपती या चार राज्यांमधील पुनर्रचना प्रक्रिया मतदारसंघ पुनर्रचना आयोगाच्या अधिकार कक्षेबाहेर काढू शकतात. तसे झाल्यास ही प्रक्रिया




निवडणूक आयोगाने राबवावी, अशीही तरतूद करण्यात आली होती. दोन वर्षांपूर्वी ईशान्येकडील ही चारही राज्ये मतदारसंघ पुनर्रचना आयोगाच्या कक्षेबाहेर काढण्यात आली. मतदारसंघ पुनर्रचना आयोग हा सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली नेमला जातो. मुख्य निवडणूक आयुक्त आणि राज्याचे निवडणूक आयुक्त त्याचे सदस्य असतात. मतदारसंघ पुनर्रचना आयोग आणि निवडणूक आयोगाकडून करण्यात येणाऱ्या मतदारसंघांच्या पुनर्रचनेच्या कामात एक फरक जाणवतो. पुनर्रचना आयोगाचे अध्यक्ष सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश असल्याने राजकीय नेत्यांना तेवढा दबाव आणता येत नाही. आसाममध्ये निवडणूक आयोगाकडून मतदारसंघांची पुनर्रचना झाल्याने मुख्यमंत्री हेमंत बिश्व सरमा यांनी हस्तक्षेप केल्याचा आरोप झाला. महाराष्ट्रातही लातूर लोकसभा मतदारसंघ राखीव झाल्याने किती रामायण घडले होते. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना त्यांचा हा मतदारसंघ खुला राहाणे अपेक्षित होते. त्यासाठी त्यांनी आपल्यावर दबाव आणला असा आरोप राज्याचे तत्कालीन निवडणूक आयुक्त नंदलाल यांनी केला होता. नंदलाल यांना त्याची किंमत मोजावी लागली होती. कारण विधिमंडळाच्या बदनामीवरून हक्कभंग प्रकरणात त्यांना एक दिवस तुरुंगात जावे लागले होते. त्यांच्यासारखा खमका अधिकारी मतदारसंघ पुनर्रचना आयोगाचा सदस्य आणि निवृत्त न्यायमूर्ती अध्यक्ष असल्याने तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या मनासारखे झाले नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आम्ही वैकुंठवासी । आलो या चि कारणासी ।
बोलिले जे ऋषी । साच भावे वर्ताविया ॥१॥

झाडू संतांचे मारग । आडराने भरले जग ।
उच्छिष्टाचा भाग । शेष उरले ते सेवू ॥धृ॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महायुतीचे खातेवाटप!

## » अजित पवारांकडे अर्थ, मुंडेंकडे कृषी, तर मुश्रीफांना 'वैद्यकीय शिक्षण

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजप, शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी या महायुतीच्या सरकारचे बहुचर्चित खातेवाटप अखेर शुक्रवारी जाहीर झाले. त्यानुसार अजित पवार यांनी अपेक्षेप्रमाणे अर्थखाते पटकावले. तर धनंजय मुंडे यांच्याकडे कृषी खात्याची जबाबदारी सोपण्यात आली. ईडीच्या कारवाईमुळे चर्चेत राहिलेले हसन मुश्रीफ यांच्या गळ्यात वैद्यकीय शिक्षण खात्याची माळ पडली आहे.**



### पवार गटाला नऊ मंत्रिपदं

» अजित पवार यांच्याकडे अर्थ खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे. अजित पवार हे महाविकास आघाडीत अर्थमंत्री होते. एकनाथ शिंदे यांनी बंड केलं त्यानंतर जेव्हा ते बाहेर पडले तेव्हा त्यांनी अजित पवारांवरही टीका केली होती.
अजित पवार यांनी निधी वाटपात पक्षपातीपणा केला होता. शिवसेनेच्या आमदारांना निधी वाटताना दुजाभाव केल्याचं म्हटलं होतं. अशात आता अर्थखातं हे अजित पवारांकडेच आलं आहे. अर्थ खातं- अजित पवारांकडे अर्थ खातं देण्यात आलं आहे. हे खातं आधी भाजपाकडे होतं आणि देवेंद्र फडणवीस हे अर्थमंत्री होते. मात्र आता अजित पवार अर्थमंत्री असतील.

विशेष म्हणजे शिवसेनेचे मातब्बर मंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडचे कृषी खाती धनंजय मुंडे यांना देण्यात आले. आता सत्तारांकडे अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन खाते सोपण्यात आले आहे. तर संजय राठोड यांच्याकडील अन्न व औषध प्रशासन विभाग हे खाते राष्ट्रवादीच्या धर्मरावबाबा आत्राम यांना मिळाले. त्यामुळे राठोड यांच्याकडे मृद व जलसंधारण हे कमी महत्त्वाचे खाते आले आहे.

छगन भुजबळ यांना अन्न व नागरी पुरवठा तसेच ग्राहक संरक्षण मंत्रालय, तर दिलीप वळसे पाटील यांना सहकार खाते देण्यात आले आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे महसूल, पशू संवर्धन खाते देण्यात आले आहे. राष्ट्रवादीचे नेते हसन मुश्रीफ यांच्याकडे वैद्यकीय शिक्षण मंत्रालयाच्या जबाबदारी देण्यात आले आहे.

तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह खाते कायम ठेवण्यात आले आहे.

राज्य मंत्रिमंडळातील नवनियुक्त मंत्र्यांच्या खातेवाटपाबरोबरच सध्याच्या मंत्र्यांच्या खात्यांमध्ये देखील काही फेरबदल करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज खातेवाटप जाहीर केले आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी मंजुरी दिल्यानंतर हे खातेवाटप जाहीर करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सामान्य प्रशासन, नगर विकास, माहिती व तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, परिवहन, सामाजिक न्याय, पर्यावरण व वातावरणीय बदल, खनिकर्म आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना वाटप न केलेले विभाग.

---

# महायुतीच्या नेत्यांमध्येच जुंपली!

## » अबे तू नेमका कुणाचा प्रचार करणार ते ठरव

। मुंबई ।

प्रतिनिधी। : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट सत्तेत सहभागी झाल्यानंतर महायुतीतील अनेक नेत्यांच्या भूमिकांची गुंतागुंत झाली आहे. एकेकाळी एकमेकांवर जोरदार टीका करणाऱ्या नेत्यांनाही दोन पावलं मागे घ्यावी लागत आहेत. ज्या नेत्यांवर खालच्या पातळीची टीका करायचे, त्याच नेत्यांशी जुळवून घ्यावं लागत आहे.**





अशी एकंदरीत स्थिती असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी आणि भारतीय जनता पार्टीचे आमदार निलेश राणे यांच्यात चांगलीच जुंपली आहे.

खरं तर, अमोल मिटकरी यांनी अलीकडेच एका मुलाखतीत म्हटलं की, राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट सत्तेत सहभागी झाला असला तरी मी भारतीय जनता पार्टीचा प्रचार करणार नाही. या विधानावरून निलेश राणे यांनी खोचक ट्वीट केलं. “आत्ताच कुठेतरी वाचलं. मिटकरी म्हणतो मी भाजपचा प्रचार करणार नाही. अमोल मिटकरी नेमका कोण आहे. आमच्या कोकणात मिटकरीसारख्या लोकांना शिमग्यातला गोमू म्हणतात. काही लोकांना भलताच कॉन्फिडन्स असतो, अशी टीका निलेश राणेंनी केली. राणेंच्या या टीकेला अमोल मिटकरींनी प्रत्युत्तर दिलं आहे.

“अबे तू नेमका कुणाचा प्रचार करणार आहे, ते ठरव आधी आणि गप राहायला शिक. तृतीयपंथीयांनी तुला तुझी लायकी दाखवली आहेच. कशाला वारंवर तोंड काळं करुन घेतोस?” अशी खोचक प्रत्युत्तर अमोल मिटकरींनी दिलं. अजित पवार गट सत्तेत सहभागी होऊन दोन आठवडेही उलटले नाहीत. तोपर्यंत महायुतीच्या नेत्यांची आपसात जुंपली आहे.

### अमोल मिटकरी नेमकं काय म्हणाले?

» ‘मुंबई तक’ला दिलेल्या मुलाखतीत अमोल मिटकरी म्हणाले, “अजित पवार हे माझे नेते आहेत. त्यामुळे त्यांनी जो निर्णय घेतलाय, त्याचं मी समर्थन केलंय. मात्र याचा अर्थ असा नाही की, मी भारतीय जनता पार्टीचा प्रचारक असेल किंवा भाजपाचं सरकार यावं, यासाठी मी प्रयत्न करेन. असं कधीही होणार नाही.”

---

# अजितदादा शरद पवारांच्या निवासस्थानी

। मुंबई ।

प्रतिनिधी । महाईन्यूज

अजित पवारांसह राष्ट्रवादी काँग्रेसच्या ४० आमदारांनी शिंदे-फडणवीस सरकारला पाठिंबा दिल्यानंतर पक्षात उभी फूट पडली आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि पक्षचिन्हावर दोन्ही गटांकडून दावा सांगितला जात आहे.

अशी एकंदरीत स्थिती असताना आज (शुक्रवार, १४ जुलै) अजित पवार अचानक शरद पवार यांचं निवासस्थान असणाऱ्या ‘सिल्व्हर ओक’वर दाखल झाले आहेत.

उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर अजित पवार पहिल्यांदाच शरद पवारांच्या निवासस्थानी दाखल झाले आहेत. काकू प्रतिभा पाटील यांच्या हाताची शस्त्रक्रिया झाल्याने विचारपूस करण्यासाठी अजित पवार



‘सिल्व्हर ओक’वर गेल्याची माहिती मिळत आहे. पण घरी शरद पवार आहेत की नाहीत? याबाबतची कोणतीही माहिती अद्याप समोर आली नाही. आज अचानक अजित पवार ‘सिल्व्हर ओक’वर दाखल झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

पण प्रतिभा पवार यांच्या हातावर शस्त्रक्रिया झाल्याने काकूंची भेट घेण्यासाठी अजित पवार शरद पवारांच्या निवासस्थानी गेल्याचं समजत आहे. काही वेळापूर्वी प्रतिभा पवार यांना ब्रेच कँडी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. त्या घरात पाय घसरून पडल्याची माहिती मिळत आहे.

# चांद्रयान 3 चं यशस्वी प्रक्षेपण!

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज

चांद्रयान-2 च्या प्रक्षेपणानंतर 3 वर्षे, 11 महिने आणि 23 दिवसांनी शुक्रवारी भारताने चांद्रयान-3 मिशन लॉच केले. आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून दुपारी 2.35 वाजता बाहुबली रॉकेट LVM3-M4 द्वारे ते अवकाशात पाठवले. 16 मिनिटांनंतर चंद्रयान रॉकेटद्वारे कक्षेत प्लेस करण्यात आले. या यशस्वी प्रक्षेपणानंतर इस्रोचे प्रमुख एस सोमनाथ म्हणाले की, चांद्रयान 3 चा चंद्राच्या दिशेने प्रवास सुरू झाला आहे. या मोहिमेद्वारे भारताला आपली अंतराळ शक्ती जगाला दाखवायची आहे. मोहीम यशस्वी झाल्यास अमेरिका, रशिया आणि चीननंतर असे करणारा भारत हा चौथा देश ठरेल. चांद्रयान-३ अंतराळयानामध्ये तीन लँडर/रोव्हर आणि प्रोपल्शन मॉड्यूल आहेत. सुमारे 40 दिवसांनंतर म्हणजेच 23 किंवा 24 ऑगस्ट रोजी लँडर आणि रोव्हर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरतील. हे दोघेही 14 दिवस चंद्रावर प्रयोग करतील, तर प्रोपल्शन मॉड्यूल चंद्राच्या कक्षेत राहून पृथ्वीवरून येणाऱ्या रेडिएशनचा अभ्यास करेल. मिशनच्या माध्यमातून इस्रो चंद्राचा पृष्ठभाग किती सिस्मिक आहे हे शोधून काढेल, माती आणि धूळ यांचा अभ्यास केला जाईल.

## आदिपुरुष चित्रपटाच्या बजेटपेक्षा चांद्रयान-3 स्वस्त

चांद्रयान-3 चे बजेट सुमारे 615 कोटी रुपये आहे तर अलीकडील आदिपुरुष चित्रपटाचे बजेट 700 कोटी रुपये होती. म्हणजे चांद्रयान-3 या चित्रपटाच्या किमतीपेक्षा 85 कोटी रुपये स्वस्त आहे. 4 वर्षांपूर्वी पाठवलेल्या चांद्रयान 2 चा खर्चही 603 कोटी रुपये होता. मात्र, त्याच्या लॉन्चिंगसाठी 375 कोटी रुपये खर्च करण्यात आले.चांद्रयान-3 चे प्रक्षेपण इस्रोच्या अधिकृत वेबसाइट आणि यूट्यूब चॅनेलवर थेट दाखवले जाईल. तुम्ही दूरदर्शनवर चांद्रयान-3 चे थेट प्रक्षेपण देखील पाहू शकता. ज्यांना सतीश धवन स्पेस सेंटरच्या लॉच व्ह्यू गॅलरीमधून प्रक्षेपण थेट पहायचे आहे, त्यांच्यासाठी स्पेस एजन्सीने IVG.SHAR.GOV.IN/ येथे नोंदणी सुरू केली आहे. आता नोंदणी बंद आहे.

## या मिशनमधून भारताला काय मिळणार आहे ?


इस्रोचे माजी शास्त्रज्ञ मनीष पुरोहित म्हणतात की, या मिशनद्वारे भारत जगाला सांगू इच्छितो की चंद्रावर सॉफ्ट लँडिंग करण्याची आणि तेथे रोव्हर चालवण्याची क्षमता आहे. यामुळे भारतावरील जगाचा विश्वास वाढेल ज्यामुळे व्यावसायिक व्यवसाय वाढण्यास मदत होईल. भारत आपल्या हेवी लिफ्ट लॉन्च व्हेईकल LVM3-M4 वरून चांद्रयान प्रक्षेपित करेल. भारताने या वाहनाची क्षमता जगाला दाखवून दिली आहे. यापूर्वी ॲमेझॉनचे संस्थापक जेफ बेझोस यांच्या 'ब्लू ओरिजिन' कंपनीने इस्रोचे LVM3 रॉकेट वापरण्यात रस दाखवला होता. BLUE ORIGIN ला LVM3 व्यावसायिक आणि पर्यटन हेतूंसाठी वापरायचे आहे. LVM3 द्वारे, ब्लू ओरिजिन आपल्या क्रू कॅप्सूलला नियोजित लो अर्थ ऑर्बिट (LEO) स्पेस स्टेशनवर घेऊन जाईल.

## मिशन फक्त दक्षिण ध्रुवावरच का पाठवले जात आहे?

चंद्राचे ध्रुवीय प्रदेश इतर प्रदेशांपेक्षा बरेच वेगळे आहेत. येथे असे अनेक भाग आहेत जेथे सूर्यप्रकाश कधीच पोहोचत नाही आणि तापमान -200 अंश सेल्सिअसपर्यंत खाली जाते. अशा परिस्थितीत बर्फाच्या रूपात अजूनही पाणी असू शकते असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. भारताच्या 2008 चांद्रयान-1 मोहिमेने चंद्राच्या पृष्ठभागावर पाण्याची उपस्थिती दर्शविली होती. या मोहिमेची लँडिंग साइट चांद्रयान-2 सारखीच आहे. ७० अंश अक्षांशावर चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ. मात्र यावेळी क्षेत्रफळ वाढविण्यात आले आहे. चांद्रयान-2 मधील लँडिंग साइट 500 मीटर X 500 मीटर होती. आता, लँडिंग साइट 4 किमी X 2.5 किमी आहे.सर्व काही ठीक राहिल्यास, चंद्रयान-3 चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ मऊ-लँड करणारे जगातील पहिले अंतराळ यान बनेल. चंद्रावर उतरण्यासाठी पूर्वीचे सर्व अंतराळ यान विषुववृत्त प्रदेशात, चंद्र विषुववृत्ताच्या उत्तरेला किंवा दक्षिणेला काही अंश अक्षांशांवर उतरले आहेत.


## लँडरमध्ये 5 ऐवजी 4 इंजिन का?

यावेळी लँडरच्या चार कोपऱ्यांवर चार इंजिन (थ्रस्टर्स) असतील, पण गेल्या वेळी मध्यभागी असलेले पाचवे इंजिन काढून टाकण्यात आले आहे. याशिवाय फायनल लँडिंग दोन इंजिनांच्या मदतीने केले जाईल, जेणेकरून दोन इंजिन आपत्कालीन परिस्थितीत काम करू शकतील. चांद्रयान 2 मोहिमेत शेवटच्या क्षणी पाचवे इंजिन जोडण्यात आले. अधिक इंधन सोबत वाहून नेण्यासाठी इंजिन काढून टाकण्यात आले आहे.



## मिशन फक्त 14 दिवसांसाठी का असेल?

मनीष पुरोहित यांनी सांगितले की चंद्रावर 14 दिवस रात्र आणि 14 दिवस प्रकाश असतो. जेव्हा येथे रात्र असते तेव्हा तापमान -100 अंश सेल्सिअसच्या खाली जाते. चांद्रयानचे लँडर आणि रोव्हर त्यांच्या सोलर पॅनलमधून ऊर्जा निर्माण करतील. त्यामुळे ते 14 दिवस वीजनिर्मिती करतील पण रात्रीच्या वेळी वीजनिर्मिती प्रक्रिया बंद होईल. वीजनिर्मिती न झाल्यास, इलेक्ट्रॉनिक उपकरणे कडाक्याची थंडी सहन करू शकणार नाहीत आणि खराब होतील.



# 'बाईपण भारी देवा'ची 26 कोटी कमाई



बाईपण भारी देवा' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला असून चित्रपटाने आतापर्यंत 26 कोटीपेक्षा जास्त कमाई केली आहे. चित्रपटातील गाणी, डायलॉग सर्वांचीच चांगली चर्चा होताना दिसत आहे. चित्रपटातील एका गाण्याचे राज ठाकरेंच्या वडिलांशी खास कनेक्शन असल्याचे आता समोर आले आहे. केदार शिंदे यांनी केलेल्या पोस्टमधून ही माहिती समोर आली आहे.चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटाने दहा दिवसांत एकूण 26.19 कोटींचा गल्ला जमवला आहे. विशेष म्हणजे हा चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीत एका दिवसात सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. बाईपण भारी देवा या चित्रपटात रोहिणी हट्टंगडी, वंदना गुप्ते, सुकन्या कुलकर्णी-मोने, शिल्पा नवलकर, सुचित्रा बांदेकर आणि दीपा परब या अभिनेत्री मुख्य भूमिकेत आहेत. या चित्रपटातील टायटल साँग, 'मंगळागौर' ही गाणी हिट झाली आहेत.

# अमिषा पटेलने सांगितला हमराजचा किस्सा



या आठवड्यात द कपिल शर्मा शोचा शेवटचा भाग ऑन एअर होणार आहे. ब्रेक घेण्यापूर्वी शोच्या शेवटच्या भागात गदर 2 चित्रपटाचे स्टार्स अमिषा पटेल आणि सनी देओल दिसणार आहेत. सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजनने नुकताच या शोचा प्रोमो सोशल मीडियावर अपलोड केला आहे. या व्हिडिओमध्ये सनी देओल आणि अमिषा पटेल कपिल शर्मासोबत दिसत आहेत. व्हिडिओमध्ये कपिल शर्मा गमतीने सनी देओलला विचारतो की, तो शोच्या सेटवर कारने आला आहे की ट्रकने? सनी देओल गदर 2 मधील तारा सिंगच्या पात्राच्या पोषाखामध्येच शोच्या सेटवर पोहोचला होता. यावर सनी देओल म्हणाला - मला आशा होती की अर्चना पूरण सिंह देखील माझ्यासोबत परत येईल, म्हणून मी ट्रकने आलो आहे.संभाषणादरम्यान, अमीषा पटेलने सनीचा भाऊ बॉबी देओलसोबत काम केल्यानंतर मिळालेल्या प्रतिक्रियेशी संबंधित एक किस्सा शेअर केला. अमिषाने सांगितले की, गदरनंतर तिने बॉबी देओलसोबत हमराज चित्रपटात काम केले. त्यात सनीऐवजी बॉबीसोबत शूटिंग करताना पाहून चाहते चांगलेच संतापले होते. शूटिंगदरम्यानच लोकांनी बॉबीला 'छोड इसको ये तेरे भाई की अमानत है' असे सांगितले होते, असे अमिषा म्हणाली.संवादादरम्यान कपिलने गमतीत सांगितले की, फिल्मसिटीमध्ये प्रवेश करणारी प्रत्येक गाडी तपासली जाते. पण, कोणीही सनी यांची गाडी तपासणीसाठी थांबवली नाही. रागाच्या भरात ते गेट उखडून फेकून देतील या भीतीने, लोकांनी त्यांना अडवले नाही. सनीने अनेक चित्रपटांमध्ये अशी भूमिका साकारली आहे. गदर चित्रपटातही त्याने हातपंप जमिनीतून उखडून टाकला होता. दुसरीकडे, अमिषाकडे पाहून कपिल शर्माने म्हटले की, ती महागड्या आईस्क्रीमसारखी दिसते आणि तिला पाहून तारा सिंह तिच्यासाठी पाकिस्तानला का जातो हे समजले.

# जान्हवी भावूक झाली



जान्हवी कपूर सध्या तिच्या आगामी 'बवाल' चित्रपटामुळे चर्चेत आहे. अलिकडेच तिने म्हटले होते की, आई श्रीदेवीला गमावणे ही तिच्या आयुष्यातील सर्वात मोठी लढाई होती. जान्हवीला विचारण्यात आले की तिच्या आयुष्यातील सर्वात मोठी लढाई कोणती होती? यावर तिने आईचे स्मरण करत सांगितले की, 2018 मध्ये आईचा मृत्यू ही आयुष्यातील सर्वात मोठी लढाई होती. जान्हवीच्या आगामी बवाल चित्रपटात दुसऱ्या महायुद्धाचा संदर्भ देण्यात आला आहे. चित्रपटाची टॅग लाइन 'हर प्रेम कहानी का अपना युद्ध होता है' अशी आहे. पिंकविलासोबतच्या संभाषणात जान्हवी म्हणाली- 'आई गमावली तेव्हा मी 'धडक'चे शूटिंग करत होते. मला वाटतं तिला गमावणं, या नुकसानाला तोंड देणं कठीण होतं. माझ्यासाठी पुन्हा काम करण्याचे धैर्य मिळवणे कठीण होते, या सर्व गोष्टींना सामोरे जाण्याचा मार्ग शोधणे माझ्यासाठी कठीण होते. या सगळ्यातून बाहेर पडणे ही माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी लढाई होती.24 फेब्रुवारी 2018 रोजी श्रीदेवी दुबईतील एका हॉटेलच्या बाथरूममध्ये मृतावस्थेत आढळल्या होत्या. श्रीदेवी त्यांचा पुतण्या मोहीत मारवाहच्या लग्नाला कुटुंबासह दुबईला गेल्या होत्या. त्यांच्या जाण्याने जान्हवी कपूर आणि खुशी कपूर यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला होता.जान्हवी कपूरचा 'बवाल' चित्रपट 21 जुलै 2023 रोजी ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाद्वारे ती वरुण धवनसोबत पहिल्यांदाच स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे.



# आलिया भट्टने उचलली पापाराझीची चप्पल

काल रात्री आलिया भट्ट तिची आई सोनी राजदान आणि बहीण शाहीन भट्टसोबत डिनरसाठी बाहेर गेली होती. जिथे ती एका फोटोग्राफरची चप्पल हाताने उचलताना दिसली. यादरम्यान, सोशल मीडियावर एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्याला पाहून चाहते तिचे खूप कौतुक करत आहेत. व्हिडिओमध्ये आलिया मुंबईतील एका रेस्तरॉबाहेर दिसत आहे. ती आईसोबत बाहेर जात होती. छायाचित्रकार त्यांचे फोटो काढण्यासाठी धावत असताना त्यातील एकाची चप्पल पायातून निघाली. आलियाने चप्पल पाहिल्यावर विचारले ती कोणाची आहे? तेथे उपस्थित असलेल्या एका छायाचित्रकाराने त्यांच्यापैकी एकाचे असल्याचे उत्तर दिले. हे ऐकून आलियाने तिच्या हाताने चप्पल उचलली आणि फोटोग्राफरला दिली. या व्हिडिओवरील कमेंट सेक्शनमध्ये चाहते आलियाच्या या कृतीचे कौतुक करत आहेत. व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'ये है असली क्वीन'. दुसऱ्या यूजरने त्याचे वर्णन डाउन टू अर्थ असे केले गेले आहे. तर तिसऱ्याने लिहिले, 'ती खूप गोड आणि विनम्र आहे, आलिया माझी आवडती अभिनेत्री आहे'.आलिया भट्ट गॅल गॅडोट आणि जेमी डोर्नन यांच्यासोबत 'हार्ट ऑफ स्टोन'मधून हॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. नेटफ्लिक्सने या स्पाय-ॲक्शन चित्रपटाचा ट्रेलर लॉंच केला आहे. या चित्रपटाद्वारे आलिया भट्टने हॉलिवूडमध्ये पदार्पण केले आहे. 'हार्ट ऑफ स्टोन' या चित्रपटात गॅल गॅडोट आणि जेनी डोर्नन मुख्य भूमिकेत आहेत. तर आलिया भट्ट खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे.आलिया भट्टच्या वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर ती लवकरच करण जोहर दिग्दर्शित रॉकी और रानी की प्रेम कहानी या चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात त्याच्यासोबत रणवीर सिंगही दिसणार आहे. या चित्रपटात जया बच्चन, शबाना आझमी आणि धर्मेंद्र यांच्याही भूमिका आहेत. हा रोमँटिक कॉमेडी-ड्रामा चित्रपट 28 जुलै 2023 रोजी रिलीज होणार आहे.

# कोहलीचा विराट रेकॉर्ड

## » विराट कोहलीने वीरेंद्र सेहवागला टाकले मागे



नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात डॉमिनिका येथे खेळल्या जात असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात रोहित आणि यशस्वी जैस्वाल यांनी शतके झळकावून विक्रमांची रांग लावली आहे. त्याचबरोबर चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या कोहलीनेही चांगली कामगिरी केली आहे. कोहलीने या सामन्यात २५वी धाव घेताच माजी क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवागला मागे टाकले आहे.**

भारतासाठी कसोटीत सर्वाधिक धावा करणारा तो आता पाचवा भारतीय खेळाडू ठरला आहे. सचिन तेंडुलकर हा भारतीय फलंदाजाकडून कसोटीत सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. त्याने २०० सामन्यांच्या ३२९ डावांमध्ये ५३.७८ च्या सरासरीने आणि ५४..०४ च्या स्ट्राईक रेटने १५,९२१ धावा केल्या आहेत. या यादीत राहुल द्रविड (१३,२६५ धावा) दुसऱ्या स्थानावर आहे. सुनील गावसकर (१०,१२२ धावा) तिसऱ्या, व्हीव्हीएस लक्ष्मण (८,७८१ धावा) चौथ्या क्रमांकावर आहेत. या यादीत वीरेंद्र सेहवाग ८,५०३ धावांसह पाचव्या स्थानावर होता पण कोहलीने आता त्याला मागे टाकत ८,५१५ धावा केल्या आहेत. यासह कोहली या दिग्गजांच्या क्लबमध्ये सामील झाला आहे.भारताने दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला, तेव्हा दोन बाद ३१२ धावा केल्या आहेत. टीम इंडियाने पहिल्या डावात १६२ धावांची आघाडी मिळवली आहे. यशस्वी जैस्वालने पहिल्याच कसोटी सामन्यात शतक झळकावून आपल्या कारकिर्दीची शानदार सुरुवात केली. त्याने कर्णधार रोहित शर्माच्या साथीने टीम इंडियाला मजबूत स्थितीत आणले. रोहित १०४ धावा करून बाद झाला.तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला शुबमन गिल सहा धावा करून बाद झाला. यशस्वीने रोहितसोबत पहिल्या विकेटसाठी २२९ धावांची भागीदारी केली. तो १४३ धावांवर नाबाद आहे. त्याचवेळी माजी कर्णधार विराट कोहली ३६ धावा करून नाबाद आहे. वेस्ट इंडिजने नऊ गोलंदाजांचा वापर केला, पण त्यांना केवळ दोनच विकेट्स घेता आल्या. ॲलिक एथेनेझने रोहितला तर जोमेल वॅरिकनने शुबमन गिलला बाद केले.

### कोहलीने संयम गमावला नाही

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये विराट कोहली दिसत आहे. खरंतर, विराट कोहलीने चौकार मारल्यानंतर आनंद साजरा केला. आता हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. याशिवाय सोशल मीडिया यूजर्स सतत कमेंट करून आपली प्रतिक्रिया देत आहेत. वास्तविक, हा चौकार विराट कोहलीच्या डावातील पहिला चौकार होता जो ८१व्या चेंडूवर आला होता. संघाने रोहित शर्मा आणि शुबमन गिलच्या दोन मोठ्या विकेट्स अवघ्या ११ धावांत गमावल्या असताना विराट कोहली फलंदाजीला आला. अशा परिस्थितीत कोहलीला क्रीझवर उभे राहून यशस्वी जैस्वालला साथ देण्याची गरज होती. यादरम्यान वेस्ट इंडिजचे गोलंदाज किंग कोहलीला हात उघडण्याची संधी देत नव्हते, पण कोहलीने संयम गमावला नाही आणि तो क्रीजवर राहिला.

# यशस्वी सेंच्यूरी आई-वडिलांना

## » यशस्वीचे वडील भूपेंद्र जैस्वाल कावड यात्रेला

। रोसेओ ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**यशस्वी जैस्वालने पदार्पणाच्या कसोटीत झळकावलेले शतक आपल्या आई-वडिलांना समर्पित केले आहे. वेस्ट इंडिजविरुद्ध पहिले कसोटी शतक झळकावल्यानंतर 21 वर्षीय भारतीय सलामीवीर म्हणाला, 'माझ्यासाठी हा खूप भावनिक क्षण होता, तो मी माझ्या पालकांना समर्पित करू इच्छितो.**

फलंदाजी अजूनही सुरू आहे, द्विशतकाचा विचार नाही, संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत नेण्यावर भर आहे. शतकानंतर यशस्वीचे वडील भूपेंद्र जैस्वाल कावड यात्रेला निघाले. ते म्हणाला, 'भोले बाबांना एवढेच मागणे आहे की माझ्या मुलाने द्विशतक झळकवावे आणि त्याच्या मेहनतीला यश मिळावे.' 'भदोही वाला' नावाच्या यूजरने यशस्वीच्या वडिलांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. व्हिडिओमध्ये यशस्वीचे वडील भूपेंद्र जैस्वाल कावड यात्रेला जाताना दिसत होते. ते म्हणाले, 'आम्ही खूप आनंदी आहोत, भदोही जिल्हा खूप आनंदी आहे. माझ्या मुलाने द्विशतक झळकावे असे मला वाटते. मी भोले बाबांना एवढेच विचारेन की माझ्या मुलाने द्विशतक करावे आणि त्याच्या (यशस्वी) मेहनतीला यश मिळावे.' यशस्वी मुंबईतून देशांतर्गत क्रिकेट खेळतो, पण त्याचा जन्म उत्तर प्रदेशातील भदोही जिल्ह्यात झाला. त्याचे कुटुंब आजही भदोही येथे राहते.'फलंदाजी करताना रोहित भैया (रोहित शर्मा) सोबत खूप चर्चा झाली. खेळापूर्वीही त्यांनी मला प्रेरित केले की ही खेळपट्टी फक्त माझ्यासाठी आहे, मी येथे धावा करू शकतो. त्यानुसार माझी तयारीही झाली. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पहिला कसोटी सामना 12 जुलैपासून डॉमिनिका येथे खेळवला जात आहे. गुरुवारी रात्री उशिरा यशस्वीने सामन्याच्या दुसऱ्या दिवशी शतक झळकावले. 143 धावा करून तो दिवसाचा खेळ संपेपर्यंत नाबाद राहिला. खेळ संपल्यानंतर त्याने पत्रकार परिषदेत पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.भारत-वेस्ट इंडिज कसोटी सामन्याचा दुसरा दिवस भारतीय सलामीवीरांच्या नावावर राहिला आहे.

### रोहित यशस्वीची 229 धावांची सलामी

कर्णधार रोहित शर्मा आणि यशस्वी जैस्वाल यांनी पदार्पणाची कसोटी खेळताना 229 धावांची विक्रमी सलामी दिली. दोन्ही सलामीवीरांनी आपापली शतकेही पूर्ण केली.कर्णधार रोहित आणि जैस्वालच्या खेळीने अनेक विक्रम केले. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच भारतीय संघाने पहिल्या डावात एकही विकेट न गमावता आघाडी घेतली.



# क्रिकेट नियमात मोठा बदल

। पुणे ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद म्हणजेच ICC ने कसोटी क्रिकेटच्या नियमांमध्ये मोठा बदल केला आहे. जागतिक कसोटी चॅम्पियनशिपचे नवे चक्र सुरू झाले आहे. ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील ॲशेस मालिकेनंतर आता भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात कसोटी मालिका खेळवली जात आहे.**

या कसोटी मालिकेदरम्यान, आयसीसीने नियमात बदल केल्याची माहिती देण्यात आली आहे.दोन्ही संघांच्या खेळाडूंसाठी दिलासादायक बाब आहे की आयसीसीने असा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे त्यांच्या खिशातून जास्त पैसे जाणार नाहीत. दक्षिण आफ्रिकेतील डरबन येथे आयसीसीच्या वार्षिक परिषदेत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले, ज्यामध्ये जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमध्ये स्लो ओव्हरटाईमसाठी आकारण्यात येणारा दंड कमी करण्यात आला आहे. कोणता आहे हा नियम कसोटी क्रिकेटमध्ये स्लो ओव्हररेटचा दंड बदलण्यात आला आहे, अशी माहिती आयसीसीने दिली. स्लो ओव्हररेटमुळे, संघांच्या खात्यातून वजा केलेल्या गुणांमध्ये कोणताही बदल झाला नाही, परंतु खेळाडूंच्या फीमध्ये कपात करण्याच्या नियमांमध्ये बदल झाला. नवीन नियमानुसार, स्लो ओव्हर रेटसाठी प्रत्येक खेळाडूची मॅच फी १०% नाही तर ५% कापली जाईल.